**Publication** : Deshonnati (Marathi) **Date:** 25.01.2013

**Edition** : Gondia Live **Page No:** 08

**Subject** : Adani Foundation Organised Haldi – KumKum & Various Competition on Makar Sankranti.

# अदानी फाऊंडेशनतर्फे मकरसंक्रातीनिमित्त हळदी-कुंकू कार्यक्रम व विविध स्पर्धांचे आयोजन

*प्रतिनिधी/ २४ जानेवारी*



**गोंदिया** : तिरोडा तालुक्यातील अदानी फाऊंडेशनच्या वतीने १५ ते २२ जानेवारी दरम्यान परिसरातील कवलेवाडा, चिरेखणी, गराडा, खमारी, काचेवानी, जमुनिया, बरबसपुरा, मेंदीपुर या गावामध्ये मकरसंक्राती निमित्त महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने हळदी-कुंकु कार्यक्रम व विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. यात या गावातील महिला व मुलींनी सहभाग घेतला.

कार्यक्रमात संगीत खुर्ची, डोळ्यावर पट्टी बांधून महिलेच्या प्रतिमेला टिली लावणे, हंडी फोड, चमचा गोही, १०० मी. सुई दोरा, दौड, पाण्याने भरलेला बाटलीत ग्लासात नाणे टाकणे, बादलीत चेंडु टाकणे या विषयांवर स्पर्धा घेण्यात आल्या. यानंतर हळदी-कुंकू कार्यक्रम घेण्यात आले. या स्पर्धेत मुली तसेच वयोवृध्द महिलांनी भाग घेऊन आनंद घेतला. या स्पर्धेत विजेत्या स्पर्धकांना संस्थेमार्फत प्रोत्साहानपर त्यांच्या घरगुती वापरासाठी उपयोगी पडणाऱ्या वस्तु पारीतोषिक म्हणून देण्यात आल्या. या निमित्ताने संस्थेने सहभागींमध्ये आरोग्य, मुलाचे शिक्षण या विषयी जाणीव जागृती होण्यासाठी विविध संदेश पोहचविले.

अशा स्वरूपाच्या कार्यक्रमांमुळे महिलांना त्यांचे कला गुण दाखविण्यासाठी अदानी फाऊंडेशनच्या सौजन्याने व्यासपीठ मिळाले असे मत सहभागी महिलांनी मांडले. तसेच यांनी अदानी फाऊंडेशन करत असलेल्या कार्यक्रमांची प्रशंसा केली. व यापुढे ही असे कार्यक्रम करत राहण्याची विनंती संस्थेला करण्यात आली. कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी अदानी फाऊंडेशनचे कार्यकर्ते कैलास रेवतकर, स्वप्निल वाहणे, सतिष भुसाळे, पुर्णप्रकाश कुथेकर, प्राची भोपळे, भाग्यश्री हिरेखण यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन संस्थेचे कार्यक्रम प्रमुख बंडु कासार यांनी केले.